


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ३६, बुधवार २५ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# माझ्यासोबत चला भ्रष्टाचार दाखवतो!

## ■ जल जीवन मिशनचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर ■ भ्रष्टाचार नसेल तर मी राजीनामा देतो ■ खा. नीलेश लंके यांचे अधिकाऱ्यांना आव्हान ■ दिशाच्या बैठकीत खा. नीलेश लंके आक्रमक

**नगर : प्रतिनिधी**

**जिल्हा विकास समन्वयक संनियंत्रण समिती अर्थात दिशाच्या पहिल्याच पार पडलेल्या बैठकीत जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पार पडलेल्या कामांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे सांगत खासदार नीलेश लंके यांनी आक्रमक भुमिका घेतली. माझ्यासोबत पाहणीसाठी चाला मी तुम्हाला भ्रष्टाचार दाखवितो असे सांगत भ्रष्टाचार नसेल तर मी माझ्या पदाचा राजीनामा देतो असे आव्हान लंके यांनी या बैठकीत दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी दिशा समितीची बैठक पार पडली. या बैठकीस समितीचे अध्यक्ष खासदार भाऊसाहेब वाकचौरे, सहअध्यक्ष खासदार नीलेश लंके, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा ग्रामीण यंत्रणेचे प्रकल्प संचालक राहुल शेळके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनेअंतर्गत २१० कामे पुर्ण झाल्याचा दावा केला जात असला तरी त्यातील पाच टक्के कामेही दर्जेदार झालेली नाहीत. इतका भ्रष्टाचार आजवर कोणत्याही योजनेमध्ये झालेला नसल्याचे सांगत या योजनेच्या दर्जाबाबत खा. लंके यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. दरम्यान पीक विमा योजनेची रक्कम बॅंकेच्या कर्ज खात्यावर परस्पर वर्ग न करण्याच्या सुचना बॅंकांना देण्यात याव्यात अशी सुचनाही खा. लंके यांनी केली.




■ जल जीवन मिशनअंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणी योजनाची कामे निकृष्ट झाल्याचे खासदार नीलेश लंके यांनी दिशाच्या बैठकीत आक्रमकपणे सांगितले.

### निकृष्ठ पाईप एक फुटावर गाडले !

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणी योजनांसाठी निकृष्ठ दर्जाचे पाईप वापरण्यात आले आहेत. दर्जाहिन पाईप जमीनीमध्ये केवळ एक फुटावर गाडण्यात आले आहेत. या योजनेसाठी कोटयावधी रूपयांचा निधी मंजुर झाला परंतू पाच टक्के योजनांचेही काम चांगले झालेले नाही. बिले काढण्यासाठी आणि टक्केवारीसाठी कामे करण्यात येणार असतील तर योजना यशस्वी होणार नाही.

**खासदार नीलेश लंके**
लोकसभा सदस्य

### केंद्रीय समितीमार्फत योजनांची चौकशी

श्रीगोंदे तालुक्यातील आनंदवाडी आणि अजनुज येथील योजनांची केंद्रीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी आपण केंद्र सरकारकडे केली आहे. या योजनेत दोष आढळलात तर कारवाई होईल असा इशारा यावेळी बोलताना खा. लंके यांनी दिला. दरम्यान, या दोन्ही गावांतील योजनेसंदर्भात आपण अनेकदा दुरध्वनी करून लक्ष वेधले आहे. काम नसताना तेथील बीले आदा करण्यात आल्याचा गंभीर आरोप लंके यांनी यावेळी केला.

### दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नका

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या २१० पाणी योजनांची पाहणी आपण जिल्हाधिकाऱ्यांना सोबत घेउन करणार आहोत.त्यात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा दोष नसला तरी शेवटच्या टप्प्यावर बोट त्यांच्याकडेच येणार आहे. चुकीच्या कामात तुमची भुमिका नसली तर दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नका असे खा. लंके यांनी आशिष येरेकर यांना बजावले.

### अधिकारी स्तरावर निकृष्ट कामे

शासनाकडून कोटयावधींचा निधी आणल्यावर तो खर्च केला असे लोकप्रतिनिधी छातीठोकपणे सांगतात. प्रत्यक्ष अधिकारी स्तरावर मात्र निकृष्ट दर्जाची कामे होत आहेत. घरकुलांसाठी पैसे आहेत, मात्र त्यासाठी जागा उपलब्ध नसल्याच्या तक्रारी जनतेकडून करण्यात येत आहेत. घरकुलांसाठी गावठाणात जागा उपलब्ध करून देण्याची मागणी खा. लंके यांनी यावेळी केली.

### या योजनांचा घेतला आढावा

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, राष्ट्रीय कृषि विकास योजना कांदा चाळ उभारणी, कृषि यांत्रिकीकरण, प्रधानमंत्री पीक विमा योजना, केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषी विकास योजना, वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण, अटल भुजल योजना, अमृत सरोवर, ई महाभुमी, ई नकाशा, ई फेरफार, स्वमित्व योजना, सामाजिक विकासाच्या योजना, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना.

# स्विकृत नगरसेवकपदी ॲड. मंगेश औटी

## सर्वांगीण विकासासाठी योगदान देणार : औटी



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर नगरपंचायतीच्या स्विकृत नगसेवकपदी ॲड. मंगेश सुभाषराव औटी यांची मंगळवारी निवड करण्यात आली. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गटनेते योगेश मते यांनी ॲड. मंगेश औटी यांच्या नावाची सुचना मांडली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण योगदान देणार असल्याचे ॲड. औटी यांनी निवडीनंतर सांगितले.**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे स्विकृत नगसेवक डॉ. सादिक राजे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर नव्या नगरसेवकाची नियुक्ती करण्यासाठी नगरपंचायत नगरसेवकांच्या विशेष बैठकीचे पिठासीन अधिकारी तथा पारनेर-श्रीगोंद्याचे प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्या उपस्थितीत बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीत गटनेते योगेश मते यांनी ॲड. मंगेश औटी यांच्या नावाची सुचना मांडल्यानंतर ॲड.औटी यांनी स्विकृत नगरसेवक पदासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे पिठासीन अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्याकडे सुपूर्द केली. कागदपत्रांची छाननी केल्यानंतर चिंचकर यांनी ॲड. औटी यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली. निवडीनंतर चिंचकर यांच्या हस्ते औटी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याधिकारी विनय शिपाई, दिपक लंके, नगराध्यक्ष नितीन अडसुळ, अर्जुन भालेकर, योगेश मते, राजू शेख, डॉ. विद्या कावरे, निता औटी, हिमानी नगरे, प्रियंका औटी, सुप्रिया शिंदे, भुषण शेलार, अशोक चेडे, डॉ. बाळासाहेब कावरे, भाऊ ठुबे, विजय भा. औटी, वैभव गायकवाड, अमित जाधव, कांतीलाल ठाणगे, अर्जुन बढे, दिपक नाईक, गणेश ठुबे, दिपक नाईक, मयुर औटी, धनंजय औटी, राजू पाचारणे, घनश्याम कार्ले आदी उपस्थित होते.

### खा. लंके यांनी केले शिक्कामोर्तब

पारनेर नगरपंचायतीची सत्ता राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी प्रत्येक वर्षी नव्या सहकाऱ्याला स्विकृत नगरसेवकास संधी देण्यात येईल असे जाहिर केले होते. त्यानुसार सुरूवातीस श्रीकांत चौरे यांना संधी देण्यात आली. त्यानंतर डॉ. सादिक राजे यांना स्विकृत नगरसेवकाची संधी देण्यात आली. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ॲड. मंगेश औटी यांना संधी देण्याचा निर्णय खा. लंके यांनी घेतला.

### सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न

खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली स्विकृत नगरसेवक पदाच्या माध्यमातून आपण पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार आहोत. सन १९९२ मध्ये वडील ॲड. सुभाषराव औटी यांनी पारनेर ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे. त्यानंतर आता आम्हाला दुसऱ्यांदा शहर विकासासाठी योगदान देण्याची संधी प्राप्त झाली असून खा. नीलेश लंके यांनी दिलेल्या संधीचे सोने करू.

**ॲड. मंगेश औटी**
स्विकृत नगरसेवक

### समन्वयातून विकास साधणार

सर्व नगरसेवकांना विचारात घेऊन शहराचा विकास करण्याचे पुर्वीपासूनचे धोरण असून त्यामुळेच शहरात मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लागली. यापुढील काळातही समन्वयातून शहर विकासाचा गाडा पुढे नेणार आहोत.

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस

# मांडओहळचे आवर्तन सुटले!

## आ. काशिनाथ दाते यांनी दिल्या होत्या सुचना

**कर्जुलेहर्या : प्रतिनिधी**

**लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे मागणी केल्यानंतर दाते यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या सुचनेनुसार मंगळवारी सकाळी सात वाजता मांडओहळ प्रकल्पातून आवर्तन सोडण्यात आले.**



परतीचा मान्सून समाधानकारक न झाल्याने विविध पिकांसह चारा पिके धोक्यात आली होती. या पिकांना जिवदान देण्यासाठी मांडओहळ प्रकल्पातून आवर्तन सोडण्याची मागणी मांडओहळ प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आ. दाते यांच्याकडे निवेदनाद्वारे उर्वरीत पान ३ वर

# कोणाचा बापही आला तरी मॅटर दबू देत नसतो!

## ■ मस्साजोग प्रकरणावरून मनोज जरांगेंचा इशारा ■ राहुल गांधींवरही केली उपहासात्मक टीका



**जालना : प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी आज पुन्हा एकदा बीड प्रकरणावरून सरकारला इशारा दिला आहे. कोणाचाही पण बाप येऊ द्या ते मॅटर मी दबू देत नाही, कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मी हटणार नाही, असे मनोज जरांगे म्हणालेत. तसेच परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी यांच्या घरी कुटुंबाची भेट घेणार असल्याचे मनोज जरांगे यांनी सांगितले.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे. या प्रकरणावर बीडमधील नेते व नव्याने मंत्री झालेले धनंजय मुंडे गप्प का आहेत, असा सवाल विचारला जात आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी देखील देशमुख कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली होती. आता पुन्हा उर्वरीत पान ३ वर






फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# रूक्ष हात-पायांची लाज वाटतेय?

**एखाद्याच्या हातात हात मिळवला की समोरच्या व्यक्तीच्या हाताचा स्पर्श कोमल वाटतो. पण त्या तुलनेत आपला हात मात्र रखरखीत असल्यासारखं जाणवतं. त्वचा कोरडी असते म्हणजे त्वचेला मॉइश्चराइज करण्यासाठी आवश्यक असलेलं सेबम ती तयार करू शकत नाही. त्यामुळे त्वचा कोरडी बनते**



योग्य आहार नसणं, जनुकीय समस्या, तापमान खूप जास्त किंवा खूप कमी असल्यानेही त्वचेच्या समस्या निर्माण होतात. पण तुम्हाला तुमची त्वचा कोरडी आहे, असं वाटत असेल तर तुमच्यासाठी एक साधा सोपा घरगुती उपाय आम्ही सांगणार आहोत. या उपायमुळे तुमच्या हातापायाची त्वचा मऊ होईल. तुम्हालाही तुमच्या हाता, पायाची त्वचा मऊ नाही तर रखरखीत आहे, असं वाटत असेल तर हा लेख तुमच्यासाठी फायद्याचा आहे. आजच्या लेखात आम्ही तुम्हाला एक जबरदस्त असा उपाय सांगणार आहे. त्या उपायामुळे तुमच्या हातापायाची त्वचा मऊ बनेल, रखरखीतपणा जाणवणार नाही. तुम्हाला फक्त नारळाचं तेल आणि त्यात काही गोष्टी मिसळून त्याचा वापर करायचा आहे

- नारळ तेल, ग्लिसरीन आणि लिंबू रस : नारळाच्या तेलासोबत आणखी दोन गोष्टींचे मिश्रण करून त्याचा वापर केल्यास त्वचा मऊ होते. आठवडाभराच्या वापरानेच याचा फायदा होत असल्याचंही दिसून येईल. नारळाच्या तेलासोबत ग्लिसरीन आणि लिंबू रस यांचे एकत्रित मिश्रण करून ते लावल्यास त्वचेवर चांगला परिणाम होतो.
- मिश्रण कसं तयार करायचं : नारळ तेल, ग्लिसरीन आणि लिंबू रस हे ठराविक प्रमाणात घेऊन त्यांचं मिश्रण करा. त्यासाठी अर्धी वाटी तेल, ग्लिसरीन दोन लहान चमचे आणि लिंबू रस एक चमचा घ्या. एका वाटीत तेल, ग्लिसरीन आणि लिंबू रस एकत्र घेऊन त्याचे चांगले मिश्रण तयार करा.
- हातापायांना कधी लावायचं? : नारळ तेलात ग्लिसरीन आणि लिंबू रस मिसळून तयार केलेले मिश्रण दररोज रात्री झोपण्याआधी हात आणि पायांना लावा. आठवडाभरातच तुम्हाला हातापायाच्या त्वचेवर फरक जाणेवल. फक्त त्वचा मऊ होण्यास नव्हे तर त्वचेवर असलेले काळे डाग कमी करण्यासही यामुळे मदत होईल. हाताच्या कोपरांना असलेला काळेपणाही यामुळे कमी होईल आणि पायसुद्धा मऊ होतील.
- डॉक्टरांचा सल्ला घ्या : त्वचेवर कोणत्याही प्रकारचे घरगुती उपाय करण्याआधी एकदा डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या. त्वचा सेन्सिटिव्ह असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच त्यावर काही उपाय करा. त्वचेला ॲलर्जी असल्यास अशा गोष्टी टाळा, अन्यथा त्वचेला नुकसान होऊ शकते.
- नेमकं काय होतं? : नारळाच्या तेलात ग्लिसरीन मिसळून लावल्याने त्वचेची एपिडेर्मल लेअर जाड होते. त्यामुळे त्वचेला केमिकल आणि धुळीच्या संपर्कात येण्यापासून रोखते. यासोबतच दोन्हींमुळे त्वचा कोरडी होण्यापासून सुरक्षित राहते. फुटलेल्या टाचांवरही हे मिश्रण उपयुक्त ठरते.
- त्वचेवरचे डागही होतील कमी : नारळाचे तेल, ग्लिसरीन आणि लिंबू रसही वापरण्यात आलं आहे. लिंबू रसामुळे त्वचा उजळ होण्यासाठी मदत होते. त्वचेवर असलेले डाग कमी करण्यासाठी लिंबू रस फायद्याचा ठरतो. त्यामुळे तुमच्या हाता पायांसाठी हा उपाय नक्कीच फायद्याचा ठरू शकतो.

## हातापायाची त्वचा कोरडी का होते?




हातापायाची त्वचा कोरडी होण्याची अनेक कारणं आहेत. शरीरात पाण्याचं प्रमाण कमी असल्याने त्वचा कोरडी होते. त्यामुळे पाणी जास्त प्रमाणात प्यायला हवं. कमी प्रमाणात पाणी प्यायल्यास किंवा हातांना मॉइश्चराइज केलं नाही तर हातापायाची त्वचा कोरडी पडते. याशिवाय हवामान बदलाचाही त्वचेवर परिणाम होतो. मात्र काही लोकांची त्वचा अशीही असते की ज्यांचे अनेक उपाय केले तरीही हातापायांच्या त्वचेचा कोरडेपणा जात नाही. अशा लोकांसाठी एक घरगुती उपाय आहे जो नक्कीच उपयुक्त ठरेल.

# कोरडी त्वचा अन् त्वचा फुटण्याच्या समस्यांनी त्रस्त?

**थंडीपासून बचाव करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गरम कपड्यांमुळे अंगाला खाज सुटणे सामान्य गोष्ट आहे. असं साधारणतः त्या महिलांसोबत होतं ज्यांची त्वचा रूक्ष व कोरडी असते. कारण या प्रकारची त्वचा खूप लवकर आपली नैसर्गिक आद्रता किंवा ओलावा गमावते. अशा परिस्थितीत लोकरीपासून बनवलेले उबदार कपडे घातल्याने त्वचेचा कोरडेपणा अधिकच वाढतो...**

ऋतूबदलामध्ये त्वचेची काळजी घेणे गरजेचे असते. कारण सततच्या या ऋतूबदलांमुळे त्वचेचा पोत बदलतो. त्वचा खराब होते. अशावेळी त्वचेला काळजी व पोषणाची आवश्यकता असते. आपण सतत हानिकारक रसायने, द्रव्यांचा मारा त्वचेवर करत असतो. त्यामुळे त्वचेचं भयंकर नुकसान होतं. त्यामुळे बाजारातील कोणतेही प्रोडक्ट्स वापण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा! चला तर जाणून घेऊया हिवाळ्यात त्वचा कोरडी पडण्यापासून वाचवण्याचे व त्वचेतील आद्रता टिकवून ठेवण्याचे उपाय जाणून घेऊ...



## मोहरीच्या तेलाने करा मालिश

अंघोळीच्या आधी मोहरीच्या तेलाने मालिश केल्यास त्वचेवर कोरडेपणा किंवा रुक्षपणाची समस्या निर्माण होत नाही. तुम्ही इतर कोणत्याही तेलाचा वापर मालिश करण्यासाठी नक्कीच करू शकता. पण त्वचेवरील आद्रता टिकवून ठेवण्यासाठी मोहरीचे तेल उत्तम पर्याय मानले जाते. कारण त्यात त्वचेतील कोरडेपणा दूर करण्याचे नैसर्गिक गुणधर्म असतात. स्वयंपाकामध्येही मोहरीच्या तेलाचा वापर केला जातो. हे तेल केवळ आरोग्यासाठीच नव्हे तर त्वचा आणि केसांच्या देखभालीसाठीही लाभदायक असते. जर चेहरा निस्तेज व कोरडा दिसत असेल, तर हे तेल अतिशय प्रभावी ठरू शकते. त्याच प्रमाणे सुंदर, घनदाट, काळ्याभोर आणि मजबूत केसांसाठी या तेलाचा वापर करू शकता. तसंच बाजारात मिळणारे महागड्या आणि केमिकलयुक्त क्रीम, लोशन आणि शॅम्पू वापरण्याऐवजी आपल्या ब्युटी केअर रुटीनमध्ये मोहरीच्या तेलाचा वापर नक्की करावा.


## उत्तम घरगुती मॉईश्चराईजर

नारळाचं दूध त्वचेत खोलवर मुरतं व त्वचेला पोषण देतं. नारळाच्या दुधामुळे बराच काळ त्वचेतील आर्द्रता टिकून राहते. दैनंदिन सकाळी त्वचेला नारळाचं दूध लावल्यास संध्याकाळपर्यंत त्वचेची आर्द्रता कायम राहते. नारळाच्या दुधाप्रमाणेच केळ देखील त्वचेसाठीही उपयुक्त आहे. केळ हे चांगल मॉईश्चराईजर आहे. केळात व्हिटॅमीन सी, ए, पॉटेशिअम, कॅल्शिअम, फॉस्फरस आणि कार्बोहायड्रेट्सचे असे भरपूर गुणधर्म असतात. जे आपल्याला कोरड्या त्वचेपासून मुक्ती तर देतातच. शिवाय त्वचेचा अनेक प्रकारचे फायदेही पोहचवतात.

या दोन्ही उपायांप्रमाणाचे कोरफड हे एक सुद्धा एक नैसर्गिक मॉईश्चराईजर आहे, जे त्वचेतील आर्द्रता कायम ठेवण्यास मदत करतं. कोरफड हे डेड स्कीन सेल्सना जीवित करून त्वचा मुलायम करण्यास सहायक ठरतं. कोरफडातील अँटी ऑक्सिडंट गुणधर्म त्वचा कोरडी होण्यापासून बचाव करतात व त्वचेची नैसर्गिक चमकही कायम ठेवतात. मध हे खूपच चांगल क्लींजर आणि मॉईश्चराईजर आहे. याची विशेष बाब म्हणजे मधाच्या वापराने त्वचा कोमल आणि चमकदार होते. मधात गुलाब जल मिक्स करून हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. काही वेळाने चेहरा कोमट पाण्याने धुवा.

## असा दूर करा कोरडेपणा

सर्वात आधी त्वचेतील वाढता कोरडेपणा रोखण्यासाठी प्रयत्न करा. यासाठी हिवाळ्यात अंघोळीसाठी जास्त गरम पाण्याचा वापर करू नका, तर थंड व गरम पाणी एकत्र करून पाण्याचं तापमान सामान्य ठेवा. जेव्हा त्वचा ओली असेल तेव्हा मॉईश्चराईजर लावा. आंघोळ केल्यानंतर नेहमी त्वचा हळूवार पुसून घ्या. त्वचेतील ओलावा कायम राहण्यासाठी आंघोळ केल्यावर तीन ते पाच मिनिटांच्या आत मॉईश्चराईजर लावा. चेहरा दिवसातून वारंवार धुणं टाळा. शक्य असल्यास फक्त रात्री चेहरा धुवा. ज्यामुळे चेहऱ्यावरील धूळ निघून जाऊन त्वचा कोरडीही पडणार नाही. ओठांसाठी चांगल्या व घरगुती लिपबामचा वापर करा. त्या लिपबाममध्ये पेट्रोलिअम जेली आणि मिनरल ऑईल असलं पाहिजे. थंडीच्या काळात बाहेरील थंडाव्यापासून बचाव करण्यासाठी चेहरा नेहमी स्कार्फने झाकून घ्या.



- खाजेवर उपाय : रात्री झोपण्याआधी संपूर्ण शरीराला ॲलोव्हेरा जेल म्हणजे कोरफडीचा गर लावा. हे जेल तुम्ही अंडरआर्म्समध्येही लावू शकता. कारण तिथली त्वचा खूपच संवेदनशील असल्यामुळे बहुतांश लोकांना लोकरीच्या कपड्यांमुळे अंडरआर्म्समध्ये इचिंगची समस्या होते. ॲलोव्हेरा जेलमध्ये ॲटीफंगल गुणधर्म असतात व हे व्हिटॅमिन ई ने परिपूर्ण असतं. हे दोन्ही घटक त्वचेसाठी लाभदायक असतात. हे लावल्याने ना त्वचा कोरडी पडते ना शरीरावर खाज सुटते.
- इतर उपाय काय? : हिवाळ्यात तहान कमी लागत असल्यामुळे आपण पाण्याचे सेवन कमी करतो. त्यामुळे शरीर व त्वचा हायड्रेटेड राहत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त पाणी पिण्याचा प्रयत्न करा. शिवाय त्वचा कोरडी पडत असल्यास झोपण्यापूर्वी रात्री व सकाळी उठल्यावर त्वचेवर खोबरेल तेल लावावे. खोबरेल तेलातील स्निग्ध पदार्थांमुळे त्वचा मऊ व तजेलदार राहते. लिंबू सरबत, ताक या पेयांचे प्रमाण वाढवा. फळे, भाज्या, तृणधान्ये अशा पदार्थांचा आहारातील समावेश वाढवा.

# हिवाळ्यात 'तुप' अत्यंत फायदेशीर

**हिवाळा सुरू झाला की त्वचा निस्तेज आणि कोरडी होऊ लागते. हिवाळ्यात आपली त्वचा आर्द्रता गमावते. यासाठी आपण बाजारातून अनेक महागडी उत्पादने वापरतो. पण या गोष्टींचा फायदा आपल्याला होतोच असा नाही. आजकाल बाजारात अनेक उत्पादने पाहायला मिळतात. पण घरातील एका गोष्टीचा वापर करून आपण या समस्येवर उपाय मिळवू शकतो. हा पदार्थ दुसरं तिसरं काही नसून तुप आहे. प्रत्येक घरात तुप असतेच काही जण घरात तुप तयार करतात तर काही बाजारातून विकत आणतात पण प्रत्येक घरात आपल्याला तूप मिळतेच. या तुपाचा वापर आपण नितळ त्वचेसाठी केसांच्या सौंदर्यासाठीही देखील करू शकतो. चला तर मग जाणून घेऊयात या तुपाचे त्वचेला होणारे फायदे आणि त्याचा आपण कसा वापर करू शकतो...**

तुपाचा वापर कोरड्या त्वचेवर जादू प्रमाणे काम करते. हे एखाद्या मॉयश्चरायजरप्रमाणे काम करते. तुम्ही चेहऱ्याला तुचा फेसपॅक देखील लावू शकता. संपूर्ण सुकल्यानंतर त्यावर गुलाबाचे पाणी फवारा. यामुळे तुमची त्वाचा नितळ होण्यास मदत होईल. त्याच प्रमाणे त्वचेवरूल मृत त्वचादेखील निघून जाण्यास मदत होईल. त्याच प्रमाणे चेहऱ्याच्या त्वचेला गरजेचे असणारे पोषण द्रव्य देखील मिळू शकतात.

- त्वचेवर येईल चमक : जर तुम्हाली निखळ तजेलदार त्वचा हवी असेल तर यासाठी तुम्ही तुपाचे २ ते ३ थेंब घ्या. त्यानंतर ५ मिनिटे चेहऱ्याला मसाज करा. पण हे करण्याआधी चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. त्यामुळे त्वचा नितळ होण्यास मदत होईल. चेहऱ्यावर लावलेले स्किन टोनर पूर्ण सुकल्यावरच तुपाने त्वचेवर मसाज करा. अशाप्रकारे तुम्ही नियमित तुपाचा वापर केला तर काही दिवसांमध्येच तुम्हाला तुमच्या त्वचेमध्ये फरक जाणवेल.
- लिप बाम म्हणून वापर : अनेक हर्बल आणि आयुर्वेदिक लिप बाम बेस तुपाचा वापर केला जातो. थंडीच्या दिवसांत जर तुमचे ओठ फाटत असतील किंवा त्यांना भेगा पडत असतील तर रात्री झोपण्यापूर्वी त्यावर तुप लावा. हा उपाय केल्याने तुमचे ओठ गुलाबासारखे मऊ होतील. यासाठी एका भांड्यात २ चमचे तूप आणि १ चमचे खोबरेल तेल वितळवून घ्या. त्यात पेपरमिंट ऑइलचे काही थेंब घाला आणि नंतर ते स्वच्छ आणि कोरड्या काचेच्या कुपीमध्ये ठेवा. त्याचप्रमाणे थोडे तुपात साखर मिसळूनही तुम्ही चांगला लिप स्क्रब तयार करू शकता.
- अँटिएजिंग म्हणून उपयोग : जर तुमचे वय जर तुमच्या चेहऱ्यावर दिसत असेल किंवा चेहऱ्यावर सुरकत्या दिसत असतील तर तुम्ही तुपाचा उपयोग करू शकता. नियमित स्वरूपात तुम्ही तुपाचा उपयोग केल्यास, हे तुमच्या त्वचेच्या आतपर्यंत जाते आणि त्वचेची छिद्र अधिक निरोगी आणि सुंदर बनविण्यास मदत करते. त्यामुळे तुम्ही सुरकुत्यांपासून दूर राहू शकता. तूप आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. रोज सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर तूप लावा. त्यानंतर हलक्या हाताने मालिश करा. चांगल्या परिणामांसाठी तुपाचा चेहऱ्यावर रोज उपयोग करा. अँटिएजिंग म्हणून याचा चांगला उपयोग होतो.



- केसांसाठी तुपाचा वापर : केस चांगले राहावे यासाठी आपण किती वेळा पार्लरमध्ये जातो. पण घरच्या घरीही तुम्ही केसांची काळजी घेऊ शकता आणि त्यासाठी तुम्हाला फायदेशीर ठरते ते म्हणजे आपल्या घरातील तूप. तुम्हीही घरातील तूप वापरून केसांसाठी फायदा करून घेऊ शकता. तूप हे केसांसाठी उत्तम कंडिशनर समजण्यात येते. यामध्ये कोणत्याही प्रकारचे रसायन नाही. त्यामुळे निस्तेज आणि शुष्क केसांसाठी याचा तुम्ही चांगला उपयोग करून घेऊ शकता. तसंच तुमच्या स्काल्पसाठीही याचा उपयोग होतो. दोन चमचे तूप आणि एक चमचा ऑलिव्ह ऑईल मिक्स करा. प्रत्येकवेळी केस धुतल्यानंतर तुम्ही याचा कंडिशनर म्हणून वापर करा आणि मुलायम केस मिळवा.

# थंडीत ओठांच्या फुटण्याने बेजार झालात?

**बदलत्या वातावरणानुसार त्वचेच्या समस्या होत असतात. यामध्ये साधारतः जरा गारवा वाटू लागला की ओठ फुटणे ही समस्या डोकं वर काढू लागते. ओठ कोरडे होऊन फाटतात आणि हे अनेकांच्या बाबतीत घडते. अशावेळी ओठांना मॉईस्चर करण्यासाठी मॉईस्चराईजर वापरण्याची गरज भासते, जेणेकरून ओठांना सुरक्षा मिळू शकते.**

आपल्यापैकी अनेकजण बाजारातील केमिकलयुक्त उत्पादने आणि लिपबामचा उपयोग करतात. यामुळे ओठ मऊ आणि मुलायम राहतात. मात्र त्यापेक्षा नैसर्गिक उत्पादनांचा वापर करून घरगुती गोष्टींचा उपयोग केला तर ओठ अधिक चांगले राहातात. मऊ आणि मुलायम राहण्यासह नैसर्गिक गुलाबी ओठ दिसतात आणि सौंदर्यातही भर पडते.

- संत्र्यांच्या सालाची पावडर : थंडीच्या दिवसात तुम्ही संत्र्यांची सालं ओठांना लावा. फाटलेल्या ओठांपासून सुटका देण्यासाठी याचा उपयोग होतो आणि परिणामकारक ठरतात. यासाठी १ चमचा संत्र्याच्या सालाची पावडर घ्या. त्यात साधारण १०-१५ थेंब बदाम तेल मिक्स करा. त्यानंतर यात ब्राऊन शुगर घालून जाडसर पेस्ट तयार करा आणि ही पेस्ट ओठांना लावा आणि काहीवेळ तसंच राहू द्या. याचा परिणाम तुम्हाला ओठावर दिसून येतो आणि मऊ मुलायम ओठांनी तुम्ही अधिक आकर्षक दिसता.
- ओठांना लावा हळद : हळद ही अँटीसेप्टिक मानली जाते. ओठांवरही याचा चांगला परिणाम होतो. हळद लावल्याने तुमच्या ओठांचा रंग अधिक उजळतो. याचा प्रयोग करण्यासाठी चिमूटभर हळद घ्या आणि त्यात थोडंसं दूध मिक्स करा. ही पेस्ट ओठांना लावा आणि काही वेळानंतर ओठ धुवा. आठवड्यातून २-३ वेळा हळदीचा ओठांवर वापर केल्याने बेस्ट रिझल्ट मिळेल.
- नारळाच्या तेलाचा करा वापर : थंडीत ओठांवर नैसर्गिक नारळाच्या तेलाचा वापर करता येऊ शकतो. फाटलेल्या ओठांची समस्या दूर करण्यासाठी हा उत्तम उपाय आहे. रात्री झोपण्यापूर्वी ओठांना नारळाचे तेल लावा. याशिवाय तुम्ही नाभीमध्ये नारळाचे तेल घालून मसाज केल्यासही फायदा होतो. ओठांचे सौंदर्य वाढविण्यास मदत मिळते.
- मध लावा : ओठांवर मध लावल्याने ओठ नैसर्गिक गुलाबी राहण्यास मदत मिळते. याचा वापर करण्यासाठी १ चमचा मध घ्या. त्यात थोडीशी ब्राऊन शुगर आणि गरम पाणी मिक्स करा. ही पेस्ट तयार झाल्यावर ओठांना लावा आणि साधारण १० मिनिट्स तसंच राहू द्या. त्यानंतर नॉर्मल पाण्याने ओठ धुवा. ओठ अत्यंत सुंदर आणि आकर्षक दिसतात.
- दुधाची साय वा मलई : थंडीच्या दिवसात ओठ गुलाबी आणि मऊ-मुलायम राखण्यासाठी ओठांना मलई लावा. मलई लावल्याने ओठांची चमक वाढते आणि यामुळे ओठ अधिक गुलाबी दिसतात. कोणत्याही केमिकलशिवाय या वस्तूंचा उपयोग ओठांसाठी करून घेता येतो. घरात दुधाची साय वा मलई सहज प्राप्त होते.



## काही अन्य गोष्टींचा वापर

- ओठांवर लावा देशी घरगुती तूप.
- लोणी ओठांवर लावल्यास अधिक सॉफ्ट आणि नैसर्गिक गुलाबी ओठ दिसतात.
- ओठांवर बटर लावल्याने ओठ मुलायम होतात.
- मोहरीच्या तेलाचा वापर ओठांवर केल्यास चमक वाढते.

## शॉर्ट न्यूज

### राहुरी पालिका प्रशासनाचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष

**राहुरी :** शहरात नागरी सुविधांचा बोजवारा उडाला असून, नगरपालिकेकडून कोणत्याही स्वरूपात पूर्तता केली जात नाही. शहरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. स्वच्छता, आरोग्य याकडेही दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे. याबाबत माजी उपनगराध्यक्ष रावसाहेब राधुजी तनपुरे यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात तनपुरे यांनी म्हटले आहे की, शहरात पाणीपुरवठ्याचा बोजवारा उडाला आहे. शहरातील काही भागांत अजूनही मध्यरात्री किंवा पहाटे पाणीपुरवठा केला जातो.

### शिवीगाळ करून दाम्पत्यास मारहाण

**नेवासा :** तालुक्यातील मोरयाचिंचोरे येथे शेतात पाणी भरत असलेल्या दाम्पत्याला मारहाण केल्याची घटना घडली.याबाबत दाखल फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत दत्तात्रय बाजीराव इलग यांनी फिर्याद दिली. दत्तात्रय बाजीराव इलग व त्यांची पत्नी हे दोघे शेतात पाणी भरत असताना त्या ठिकाणी मुकेश कारभारी इलग, भानुदास कारभारी इलग, अर्चना मुकेश इलग, अनिता भानुदास इलग, गयाबाई कारभारी इलग हे हातात दगड, लाकडी दांडे, काठ्या घेऊन आले. तू आम्हास शिवीगाळ करत आम्हाला संपवून टाकू अशी जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

### खांडगाव रस्त्यावरील खडी उखडली

**पाथर्डी :** तालुक्यातील खांडगाव ते त्रिभुवनवाडी रस्त्यावर वर्षभरापूर्वी खडी टाकण्यात आली. मात्र, त्यानंतर पुढे कामच न झाल्याने आता रस्त्यावरील खडी उखडली असून, वाहन चालकांना प्रचंड कसरत करावी लागते, विशेषतः दुचाकी चालकांना प्रचंड कसरत करावी लागते. उर्वरित काम ठेकेदार विसरला की काय? असा सवाल या भागातील ग्रामस्थ करीत आहेत. खांडगाव ते त्रिभुवनवाडीपर्यंतच्या पाच किलोमीटर रस्त्याचे काम दोन वर्षापूर्वीच मंजूर झाले होते. रस्त्याच्या कामासाठी शासनाने एक कोटी पंचवीस लाखाचा निधी मंजूर केला आहे.

### बिबट्याच्या हल्ल्यात ३४ वर्षीय युवक ठार

**संगमनेर :** बिबट्याच्या हल्ल्यात युवक ठार घटना झाल्याची रविवारी (दि. २२) सकाळी १०: ३० वाजेच्या सुमारास समोर आली. वनविभागाच्या हद्दीत संगमनेरातील हिवरगाव पावसा शिवारात रामनाथ सूर्यभान गुरुकुले यांचा मृतदेह आढळून आला. बिबट्याने त्यांना ओढत जंगलात नेले, त्यांच्या शरीरावरील अनेक ठिकाणी गंभीर जखमा आढळून आल्या आहेत. मृतदेहाची उत्तरीय तपासणी होऊन अहवाल आल्यानंतर नेमका मृत्यू कशामुळे झाला. हे स्पष्ट होईल, असे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. संगमनेर भाग १चे वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन लोंढे हे देखील तेथे पोहोचले.

### आरोग्य अधिकारी शिंदे यांना निलंबित करा

**श्रीरामपूर :** तालुक्यातील टाकळीभान प्राथमिक आरोग्य केंद्रात आदिवासी महिलेच्या प्रस्तुतीसाठी झालेल्या अवहेलनेबाबत आमदार हेमंत ओगले यांनी आक्रमक होत आरोग्य यंत्रणेबाबत निष्काळजी असलेले तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन शिंदे यांना निलंबित करावे, अशी मागणी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात केली. टाकळीभान येथील आरोग्य केंद्रात आदिवासी महिला प्रसुतीसाठी दाखल झाल्यानंतर तेथे वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी फोन देखील उचलला नाही.

# भर सभेत नीतेश राणेंच्या गळ्यात घातली कांद्याची माळ

### शेतकऱ्याने माईकवर बोलण्याचा केला प्रयत्न पोलिसांनी तातडीने घेतले ताब्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

**महायुतीमधील नवनिर्वाचित मंत्री नीतेश राणे नाशिक येथील सटाणा तालुक्यात आले होते. यावेळी त्यांची सभा आयोजित करण्यात आली होती. सभेत बोलत असताना एका शेतकऱ्याने भर सभेत बोलत असताना नीतेश राणे यांना कांद्याची माळ घातल्याचा प्रकार घडला आहे. यानंतर पोलिसांनी या शेतकऱ्याला ताब्यात घेतले आहे.**



सटाणा येथे सभेत मंत्री नीतेश राणे बोलत होते. यावेळी कांदा उत्पादक शेतकरी अचानक मंचावर आला आणि त्याने थेट कांद्याची माळच राणेंच्या गळ्यात घातली. या नंतर शेतकरी माईकवर बोलण्यास गेला तेवढ्यात पोलिसांनी त्यांला अडवले आणि ताब्यात घेतले. यावेळी नीतेश राणे म्हणाले शेतकऱ्याला थांबवा त्याच्या समस्या ऐकून घेऊ. मात्र, पोलिसांनी तोपर्यंत शेतकऱ्याला ताब्यात घेतले असल्याचे दिसून आले आहे.

दरम्यान, सध्या महाराष्ट्रात कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत आहे. कांद्याचे दर घसरणीला लागले आहेत. याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. गेल्या दोन आठवड्यात कांद्याच्या दरात तब्बल १५०० ते २००० रुपयांची घसरण झाली आहे. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजार समितीमध्ये कांद्याला सरासरी १ हजार ९०० रुपयांचा दर मिळत आहे. जास्तीत जास्त २ हजार ८०० रुपये मिळत आहेत.

सरकारी यंत्रणांमार्फत कांद्याची खुलेआम विक्री होत असली तरी त्याचा पुरवठा पुरेसा होत नाही. तसेच देशातील अनेक राज्यांमध्ये गेल्या महिनाभरात किरकोळ दर ६० ते ८० रुपये प्रतिकिलो होते. मात्र, सध्या कांदा २००० प्रतिक्किंटल ते २५०० रुपयांच्या आसपास विकत आहे. याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. देशांतर्गत वाढलेली कांद्याची आवक व कांदा निर्यातीत येणारे अडथळे यामुळे कांद्याचे भाव घसरले आहेत. कांदा निर्यातशुल्क तातडीने मागे घ्यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# पुणतांब्यात धार्मिकस्थळाची विटंबना; ३ दिवसांत तपास न लागल्यास उपोषण

### ग्रामस्थांनी रास्ता रोको करत दिला इशारा

**पुणतांबा : प्रतिनिधी**

**दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या पुणतांबा गावात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास गोदावरी नदीकाठी एका धार्मिक स्थळाची तोडफोड करून विटंबना करण्यातआली. पुणतांबा परिसरात घटनेचेतीव्र पडसाद उमटलेले आहे. याघटनेने पुणतांबा परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेच्या पार्श्वभूमीवर सोमवारी आशा केंद्र चौक येथे रास्ता रोकोकरून निषेध सभा घेण्यात आली.यात हजारो ग्रामस्थ सहभागी झाले.तीन दिवसात घटनेचा छडा न लागल्यास उपोषणाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. पुणतांबा गावात धार्मिक स्थळाची विटंबना करण्याची ही दहा दिवसांतील दुसरी घटना आहे.**




या घटनेच्या निषेधार्थ सोमवारी पुणतांबा बंद ठेवण्यात आले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गावात पोलिस बंदोबस्त वाढवला असून वरिष्ठ पोलिस अधिकारी पुणतांबा गावात ठाण मांडून घटनेचा तपास करीत आहे.ग्रामस्थांच्या मागणीनुसार अहिल्यानगर येथील श्वान पथकाला पाचरण केले.घटनास्थळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक कलबुर्गी, शिर्डी विभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमणे, राहाता तहसीलदार अमोल मोरे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. तसेच ग्रामस्थाना घटनेचा तपास लवकरात लवकर लावण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

घटनेच्या पार्श्वभूमीवर पुणतांबे गावातील आठवडे बाजार व गावातील बाजारपेठा बंद ठेवल्या आहेत. घडलेली घटना निंदनीय असून या घटनेची सखोल चौकशी करून आरोपीला अटक करण्याची मागणी पुणतांबा ग्रामस्थांना रास्ता रोको केला. घटनेतील आरोपीला लवकरात लवकर अटक करण्याचे आश्वासन पुणतांबा ग्रामस्थांना पोलिसांनी दिले. पोलिस प्रशासनाच्या आश्वासनानंतर आशा केंद्र चौक पुणतांबा येथील रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

पुणतांबा परिसरात आठ ते दहा दिवसांपूर्वी पुणतांबा रेल्वे स्थानकाजवळील एका धार्मिकस्थळाची माथेफिरूव्यक्तीने विटंबना केली होती. त्या घटनेच्या दुसऱ्या दिवशी संबंधित माथेफिरूला अटक केली होती. त्यानंतर रविवारी ही घटना घडली.

**लवकरच छडा लावणार**

मागील घटनेतील आरोपीला तत्काळ अटक केली होती.आताही पोलिस युद्ध पातळीवर समाजकंटकांचा शोध घेत आहेत.ग्रामस्थानी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता व सलोखा राखावा असे आवाहन शिर्डीचे पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने यांनी केले आहे.



# बिबट्याच्या हल्ल्यात तरुण ठार; बळी जाण्याची वर्षातील चौथी घटना

**संगमनेर : प्रतिनिधी**

**बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एका ३४ वर्षीय तरुण ठार झाला. रामनाथ सूर्यभान गुरुकुले ( रा.सावरगाव तळ) असे मयत युवकाचे नाव आहे. गुरुकुले यांच्या छातीपासून डोक्यापर्यंतचा सर्व भाग लचके तोडत बिबट्याने खाऊन टाकला. संगमनेर तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यात मानवी बळी जाण्याची या वर्षातली ही चौथी घटना ठरली. हिवरगाव पावसा शिवारात एका ठिकाणी एक दुचाकी उभी केलेली असून शेजारी चपला पडलेल्या आहेत आणि रक्ताचे डागही पडलेले आहेत, अशी माहिती तेथील रहिवाशांनी संगमनेर पोलिसांना दिली होती.**

तालुका पोलीस ठाण्यातील हवालदार अमित महाजन, आशिष आरवडे, संगमनेर वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन लोंढे हे देखील तेथे पोहोचले. पोलिसांनी दुचाकी उभ्या असलेल्या ठिकाणापासून काही अंतर पुढे जाऊन पाहत असताना गवताला, दगडांना रक्ताचे डाग लागलेले दिसले. त्यानंतर छिन्नविछिन्न अवस्थेत एकाचा मृतदेह त्यांना आढळून आला. शरीरावरील अनेक ठिकाणी गंभीर जखमा झालेल्या होत्या. छातीपासून डोक्यापर्यंतचा भाग पूर्णतः लचके तोडून खाल्ल्याचे दिसून आले.

संबंधितांची ओळख पटवण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला असता त्याचे नाव रामनाथ गुरुकुले असल्याचे निष्पन्न झाले. प्रथमदर्शनी हा प्रकार बिबट्याने केलेल्या हल्ल्यातच झाला असल्याचा कयास स्थानिक रहिवाशी, पोलीस आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. याशिवाय अन्य हिंस्र प्राण्याने देखील हल्ला केलेला असल्याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली. उत्तरीय तपासणीनंतर यावर प्रकाश पडणार आहे. उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला. गणेश दादाभाऊ शिरतार (रा. सावरगाव तळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. सहायक फौजदार बी. वाय. टोपले अधिक तपास करीत आहेत.

**वाचकांच्या लेखणीतून**

# लीळाचरित्रकार म्हाइंभट कुठले?

महानुभाव संप्रदायाचा लीळाचरित्र हा मराठी वाङ्मयातील आद्य गद्यग्रंथ (इ.स.१२००) होय. हा ग्रंथ म्हणजे चक्रधर स्वामींचे चरित्र आणि आठवणी सांगणारा महत्त्वाचा ग्रंथ आहे. म्हणजे दुसऱ्या अर्थाने मराठी वाङ्मयातील हा पहिलाच चरित्रग्रंथही आहे. भाषिक, व्याकरणिक, वाङ्मयीन, ऐतिहासिक तसेच सामाजिक अभ्यास म्हणूनही हा ग्रंथ अती महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचे लेखक म्हाइंभट हे आहेत. ते महानुभावपंथीय असून स्वामींच्या भक्तांमध्ये व निकटवर्तीयांमध्ये त्यांची गणना होते.

या ग्रंथाच्या लेखकाविषयी, म्हाइंभटांविषयी, विशेष माहिती उपलब्ध नाही. ते लीळाचरित्र ग्रंथाचे लेखक असून त्यांचे मूळगाव अस्तगाव किंवा सराळा होय अशी त्रोटक माहितीच माझ्या वाचनात आली होती.

विष्णू भिकाजी कोलते यांनी संपादित केलेल्या लीळाचरित्राची आवृत्ती प्रथमतः माझ्या वाचनात आली. तिच्यातही म्हाइंभटांचे मूळगाव अस्तगाव नेमके कुठले, याचा बोध होईना. हे स्थान म्हणजे आपल्या पारनेर तालुक्यातील अस्तगाव हेच असावे असा माझा (गैर)समज होता. अखेर तो गैरसमजच सिध्द झाला! म्हणून मी जाणकार, लेखक आणि संशोधक यांच्याशी या बाबतीत संपर्क साधला. पण माझ्या हाती काहीच लागले नाही. महानुभाव वाङ्मयाचे थोर अभ्यासक, संशोधक आणि संपादक डॉ सुरेश डोळके प्रसिद्ध आहेत. त्यांनी संशोधित आणि संपादित केलेला रुक्मिणी स्वयंवर हा महानुभावीय ग्रंथ प्रसिद्धच आहे. डॉ. सुरेश डोळके यांचे सुपुत्र डॉ राजेंद्र डोळके हे नामांकित आणि साक्षेपी लेखक आहेत. ते नागपूर तरुण भारतच्या रविवारच्या आसमंत पुरवणीत साहित्यतळी



मराठी भाषा संवर्धन • म्हाइंभट यांनी १२७८ मध्ये लिहिला मराठीतील पहिला आद्यग्रंथ

श्रीरामूपर तालुक्यातील सराला गावातून मराठी भाषेतील साहित्य निर्मितीचा प्रारंभ

नवनाथ कुताळ | श्रीरामपूर

म्हाइंभटांच्या जन्मगावी त्यांचे स्मारक व्हावे

संस्कृती संपायला फारसा वेळ लागणार नाही

नावाचा स्तंभ चालवीत असत. त्यांच्याशीही मी फोनवरून तर कधी व्हाट्सअपवरून संपर्क साधून लीळाचरित्रकार म्हाइंभट यांच्याविषयी इच्छित माहिती विचारली. पण ती मिळू शकली नाही. त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल मी त्यांना धन्यवादही दिले.

एक दिवस मला व्हाट्सअपवर नियतकालिकाच्या एका कात्रणाची फोटो कॉपी कुणीतरी पाठविली. ते वाचून डॉ राजेंद्र डोळके यांना त्या कत्रणाची फोटोकॉपी आणि एक मेसेजही पाठविला :- म्हाइंभट यांचे मूळ गाव कोणते? आपणास विचारलेल्या प्रश्नाला आपसूक उत्तर मिळाले आहे. आपणासही विदित व्हावे म्हणून पाठविले आहे. म्हाइंभट यांचे मूळ गाव सराला, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर. संदर्भ दिव्य मराठी. पाठविणाऱ्या व्यक्तीने अधूरीच माहिती पाठविली असे वाटते. प्रेषक संशोधनात्मक लेखनाशी परिचित दिसत नाही. असो. आपल्या पदरात पडले ते पावन करून घेऊ.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# काष्टीत गावठी दारूचा अड्डा उद्ध्वस्त

### ५१ लाखांचा मुद्देमाल जप्त: ५ जेरबंद | शेतातील उसाच्या आडोशाला होता अड्डा | अवैध गॅस वाहतुकीवरही कारवाई



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील काष्टी येथील एका शेतकऱ्याच्या शेतामध्ये सुरू असलेला गावठी हातभट्टी दारूचा अड्डा श्रीगोंदे पोलिसांनी उद्ध्वस्त केला. तेथून सुमारे ५१ लाख ५९ हजार रुपयांचे मुद्देमाल जप्त करून पाच जणांना ताब्यात घेतले. दरम्यान, गॅसची अवैध वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई करीत पोलिसांनी २६ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त करीत एकास अटक केली.**

पोलिसांच्या दोन वेगवेगळ्या कारवाईत ७८ लाख २२ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एकूण सहा जणांना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी सोमवारी (२३ डिसेंबर) श्रीगोंदे पोलिस ठाण्याला भेट देऊन कारवाईबाबत पुढील सूचना केल्या.

पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, काष्टी परिसरातील अजनूज रोडलगत राहुल दामोदर बनसोडे हा रावसाहेब वामनराव पाचपुते यांच्या शेतात गावठी हातभट्टी तयार करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पाहणी केली असता, शेतात उसाच्या आडोशाला रसायनापासून हातभट्टीची गावठी दारू तयार करताना दिसून आले. त्यानुसार पोलिसांनी विशाल रावसाहेब पाचपुते (वय २३, काष्टी), दीपू राम विलास (वय ३५, रा. सैदापूर, उत्तर प्रदेश), गणेश रामबालक शंकर (वय २२, रा. मुठाह, उत्तर प्रदेश), मनोजकुमार रामपाल सिंग (वय ४५, रा. खचिनखंडा, उत्तर प्रदेश) यांना ताब्यात घेतले.

गावठी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी लागणारे ७२ हजार लिटर कच्चे रसायन, गावठी हातभट्टीची ५०० लिटर तयार दारू, तुरटीच्या १० गोण्या, काळा गुळ, तसेच चारचाकी वाहने, असा एकूण ५१ लाख ५९ हजार ६० रुपयांची गावठी हातभट्टीची दारू व कच्चे रसायन व इतर साहित्य जप्त केले. पोकॉ संदीप पोपट राऊत (वय ३३) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

(पान १ वरून)

### मांडओहळचे आवर्तन सुटले!

केली होती. शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून आ. दाते यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून पाणी सोडण्याच्या सुचना दिल्या.

मांडओहळ प्रकल्प यंदा पुर्ण क्षमतेने भरला असून कालव्यातून रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्यात आल्याने खडकवाडी, पळशी, वासुंदे, शिक्री या परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पाणी पोहचले पाहिजे अशा सुचनाही आ. दाते यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या आवर्तनामुळे रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरबरा या पिकांना फायदा होणार आहे.

प्रगतीशिल शेतकरी विकास रोकडे, सखाराम नवले, शिवाजी गागरे, धनंजर ठोकळे, विठ्ठल शिंदे, अमोल रोकडे, गणेश चौधरी, विठ्ठल हुलावळे, अरूण गागरे, संतोष शिंदे, आनंद खोडदे, अंबादास नवले, पंकज गागरे, भाऊसाहेब फटांगरे, अनिल गागरे या लाभार्थ्यांनी आवर्तन सोडण्याची मागणी केली होती.

**पाण्याचा वापर काटकसरीने करावा**

लाभार्थी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना देऊन रब्बी हंगामासाठी आवर्तन सोडण्याच्या सुचना देण्यात आल्या. शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पाणी पोहचले पाहिजे अशी ताकीद जलसंपदा विभागाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या असून शेतकऱ्यांनीही काटकसरीने पाण्याचा वापर करावा.

आ. काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

### कोणाचा बापही आला तरी मॅटर दबू देत नसतो!

एकदा ते मस्साजोगला जाणार असून २८ डिसेंबर रोजी आयोजित मोर्चात ते सहभागी होतील. बीड जिल्ह्यातील जनतेने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहनही मनोज जरांगे यांनी केले आहे.

मनोज जरांगे कुणाचा बापही आला तरी देखील संतोष देशमुख यांच्या हत्येचा प्रकरण दबू देणार नाही. कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मी हटणार नाही, असा इशारा मनोज जरांगेंनी दिला आहे. सरकारला एकमेकांना मोबाईलचे फोन केलेले तपासायला एवढे दिवस लागतात का? असा सवालही त्यांनी केला. एकदा बीड जिल्ह्यातील जनतेने तपास हातात घेतला, तर मग सरकारला कळेल, अशा शब्दात त्यांनी सरकारलाही इशारा दिला.

दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी परभणी दौऱ्यावर आले, परंतु त्यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली नव्हती. याबाब मनोज जरांगेंना प्रश्न विचारला असता, त्यांना रस्त्यात येताना गाडी लागली नसेल, त्यांच्याकडे डिझेलला पैसे नसतील, गरीब माणूस आहे म्हणून आला नसेल, अशी उपहासात्मक टीका जरांगे पाटील यांनी केली.

# बाजारतळाचे काम दर्जेदार व्हावे

## नगरसेवक अशोक चेडे यांच्या सुचना

**पारनेर : प्रतिनिधी**

**६३ लाख रूपये खर्चून पारनेर शहरातील बाजार तळाचे सुशोभिकरण करण्यात येत असून मोठा खर्च करून करण्यात येत असलेले हे काम दर्जेदार करण्याच्या सुचना भाजपाचे नगरसेवक अशोक चेडे यांनी दिल्या.**



पारनेर शहरातील बाजार तळाच्या सुशोभिकरणाच्या कामाचे नगरसेवक अशोक चेडे यांनी अधिकाऱ्यांसह पाहणी केली.

सर्वेक्षण २०२० अंतर्गत वैशिष्ठपूर्ण योजनेअंतर्गत पारनेर नगरपंचायतीस मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेतून हे काम पुर्ण करण्यात येत आहे. त्यात संपूर्ण बाजार तळावर पेव्हींग ब्लॉक बसविण्यात येत असून पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी अंतर्गत गटार योजनाही करण्यात आली आहे. बाजार तळावरील ओटयांची दुरूस्ती तसेच दोन प्रवेशद्वारांचा या कामामध्ये समावेश आहे.

चेडे म्हणाले, पारनेरचा बाजारतळ ऐतिहासिक आहे. या बाजारतळावर देशपातळीवरील नेत्यांच्या सभा झाल्या असून अनेक सामाजिक, राजकीय घटनांचे हे स्थळ साक्षीदार आहे. भविष्यातही या ठिकाणी देशपातळीवरील नेत्यांची हजेरी लागणार असल्याने होणारे काम दर्जेदार असले पाहिजे अशी अपेक्षा चेडे यांनी व्यक्त केली.

चेडे यांनी नगरपंचायतीच्या अभियंत्यासह या कामाची पाहणी केली.

यावेळी ठेकेदाराचे प्रतिनिधीही उपस्थित होते. पेव्हींग ब्लॉक दर्जेदार हवेत तसेच ओटयांची दुरूस्ती करताना सिमेंटचा वापर योग्य पध्दतीने करा अशा सुचना चेडे यांनी दिल्या.

तब्बल ६३ लाख रूपयांचा निधी खर्च होत असताना त्याचे प्रतिबिंब कामाच्या दर्जातून दिसले पाहिजे. केवळ काम पुर्ण करून बिले काढण्याची घाई केल्यास ते खपवून घेतले जाणार नाही. या कामासाठी सहा महिन्यांचा अवधी देण्यात आहे. ठेकेदाराने वेळेत काम पुर्ण करताना दर्जाकडे लक्ष द्यावे, नसता आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल असा इशारा चेडे यांनी यावेळी बोलताना दिला.

### दाते यांना साकडे घालणार

**विविध विकास कामे माग लावण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांना साकडे घालून पारनेर नगरपंचायतसाठी राज्य शासनाच्या नगरविकास खात्याकडून निधी मंजुर करण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. लवकरच यासंदर्भात दाते यांची भेट घेणार आहोत.**

**अशोक चेडे**
**भाजपा नगरसेवक**

# निघोज ग्रामीण परिवाराने दर्जेदार शिक्षण संस्था उभी केली

## गीतांजली शेळके यांचे गौरोद्गार । न्यू इंग्लिश मेडियम स्कुलचे स्नेहसंमेलन

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक बाबाबासाहेब कवाद यांना अभिप्रेत असलेली दर्जे दार शिक्षण संस्था निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे वसंत कवाद यांनी सहकाऱ्यांच्या मदीने उभी केल्याचे गौरवोद्गार जीएस महानगर व जिल्हा बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी काढले.**

निघोज संस्था परिवाराच्या न्यू इंग्लिश मेडियम स्कुलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात शेळके या बोलत होत्या. मळगंगा ट्रस्टचे कार्याध्यक्ष शांताराम लंके हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तर भास्करराव कवाद हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्राचार्य डायस यांनी शिक्षण संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला.

यावेळी बोलताना शेळके म्हणाल्या, या शैक्षणिक संकुलात शिक्षण घेतलेले विद्यार्थी, डॉक्टर, इंजिनिअर, उद्योजक तसेच अधिकारी पदावर कार्यरत आहेत. या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे फळ असल्याचे शेळके म्हणाल्या.

स्नेहसंमेलनानिमित्त पाहुण्यांची मनोगते झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतीक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची मने जिंकून घेतली. पालक तसेच हौशी नागरीकांनही या स्नेहसंमेलनाचा मनासोक्त आनंद घेत विद्यार्थ्यांच्या कला गुणांचे कौतुक केले. स्नेहसंमेलनास निघोज व परिसरातील विविध मान्यवर, संस्थांचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी, पालक मोठया संख्येने उपस्थित होते. नेटकेपणाने पार पडलेल्या या स्नेहसंमेलनासाठी प्राचार्य डायस, व्यवस्थापन प्रतिनिधी संगिता कवाद, को ऑडनेटर मोनीका, सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



निघोज येथील न्यू इंग्लिश मेडियम स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

### विद्यार्थ्यांचा गौरव

**यावेळी स्वर्गीय मास्टर ऋत्विक दत्तात्रय कवाद याच्या स्मरणार्थ इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण प्रथम तिन विद्यार्थ्यांना रोख रक्कम तसेच सन्मानचिन्ह देउन सन्मानीत करण्यात आले. वर्षभरात विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांनाही मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.**

### प्रगतीचा आढावा

**संस्थेचे सचिव वसंत कवाद यांनी सन २००५ पासून संस्थेची प्रगती कशा पध्दतीने झाली, शैक्षणिक गुणवत्ता तसेच कामकाजाची माहिती उपस्थितांना दिली. संस्थेचे अध्यक्ष शांताराम कळसकर यांनी संस्थेची गुणवत्ता उंचावण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला.**

# कारेगांवमध्ये 'हॉर्न बजाने की बिमारी'!


## 'कर्नकर्कश हॉर्न'मुळे कारेगावकरांची झोप उडाली । रूग्णांनाही सहन करावा लागतोय मोठा त्रास

**शिरुर : प्रतिनिधी**

**पुणे- नगर रस्त्यावर कारेगांव येथे सध्या कर्णकर्कश्श हॉर्न बजाने की बिमारी पसरत आहे. विशेषत: लक्झरी बस आणि इतरही वाहनचालकांकडून कर्णकर्कश्श हॉर्नचा वापर केला जातो त्यातून ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. असे हॉर्न वाजवण्यावर बंदी आहे. मात्र कारवाई होत नसल्याने आवाजाचा गोंगाट वाढला आहे. आवाजाचे हे प्रदूषण रोखण्यासाठी अशा वाहनांवर पोलीसांनी कारवाई करावी, अशी नागरीकांची मागणी आहे.ज्येष्ठ नागरिक, रात्रपाळी करून आलेले.**

पुणे- नगर रस्त्यावर कारेगांवमध्ये रात्रीच्यावेळी आणि पहाटे लक्झरी बसची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरु असते. मराठी शाळा चौक, कारेश्वर मंदिर चौक, यश इन चौक आदी परीसरात या बस प्रवाशांची चढ उतार करण्यासाठी थांबतात. त्यातून बऱ्याचदा वाहतुकीचा खोळंबा होतो अन् मग वाहनांमध्ये कर्णकर्कश्श हॉर्न वाजविण्याची चढाओढच सुरु होते.

कंपनीचे कर्मचारी, लहान मुले, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि रस्त्याच्या लगत दवाखान्यात उपचार घेत असलेल्या रुग्णांना या कर्णकर्कश हॉर्नच्या आवाजाचा मोठा त्रास होतो. अशा वाहनचालकांचे प्रथम प्रबोधन करावे व नंतर कारवाईचा बडगा उचलावा त्यामुळे ध्वनी प्रदूषण पसरविणाऱ्या वाहनचालकांवर चाप बसेल. तसेच कठोर नियमावली बनवावी, अशी मागणी नागरिक करत आहेत. रस्त्यावर अचानक वाजविल्या जाणाऱ्या हॉर्नमुळे अन्य वाहनधारक विचलित होतात. यातून अपघात घडण्याचा धोकाही संभवतो.



### हॉर्नच्या अतिवापराने आजारांचा धोका !

**कर्णकर्कश हॉर्नमुळे आरोग्याच्या विविध दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. ऐकायला कमी येणे, कानात बेल वाजत राहिल्यासारखा आवाज येणे, झोपेत सतत बिघाड होणे, अस्वस्थता वाटणे, वेदना होणे अथवा थकवा येणे, कामाच्या ठिकाणी काम करण्याची इच्छा कमी होणे याबरोबरच उच्च रक्तदाब, हृदयरोग, मानसिक ताण, चिडचिडेपणा, नैराश्य आणि बहिरेपणा या त्रासांचा सामना करावा लागू शकतो. शाळा, हॉस्पिटल अशा ठिकाणी 'नो हॉर्न प्लीज' असे फलक लावणे गरजेचे आहे.**

**डॉ. गणेश भडांगे**
**बालाजी हॉस्पिटल, कारेगांव**

### वाहन कायद्यात काय आहे तरतूद ?

**केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ चे नियम १९९ मधील तरतुदीनुसार वाहनास योग्य हॉर्न बसविणे आवश्यक आहे. कुठल्याही वाहनांना वेगवेगळे आवाज काढणारे, प्रेशर हॉर्न किंवा त्या पद्धतीचे कुठलेही यंत्र, रिव्हर्स हॉर्न किंवा मल्टीटोन हॉर्न बसविण्यास नियम १९९ अन्वये बंदी आहे.कायद्याचा भंग केल्यास चालक, मालकाला एक हजार रूपये दंडाची शिक्षा आहे. नवीन मोटार वाहन कायद्यात दुसऱ्यांदा हा गुन्हा केल्यास दोन हजार रुपये दंडाची तरतूद आहे. तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियमअंतर्गत विहीत ध्वनी प्रदुषण नियमन व नियंत्रण नियम २०००च्या तरतुदीप्रमाणे विहीत विशिष्ट डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणारे विशेषत: प्रेशर हॉर्न हे ध्वनी प्रदूषण करताना आढळल्यास त्या कर्कश हॉर्न वाजविणाऱ्या चालकासह एक लाख दंड व पाच वर्षे शिक्षा किंवा दोन्हीही होऊ शकते.**

### पाठक यांचा आदर्श घेण्याची गरज !

**पुणे हे एकमेव असे शहर आहे जिथे वाहनांची संख्या शहरातील लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. पुण्यामध्ये दररोज एक कोटी वेळा हॉर्न वाजवला जातो; पण हॉर्न न वाजवताही सुरक्षित प्रवास करता येतो, हे एका अवलियाने कृतीतून सिद्ध केले आहे. देवेंद्र पाठक असे या अवलियाचे नाव आहे. पाठक यांनी गाडी चालवताना ४ वर्षांत एकदाही हॉर्न वाजवला नाही. याची नोंद घेत पोलिसांनीही त्यांचा गौरव केला होता. कर्णकर्कश आवाजाने त्रस्त झालेल्यावाहनचालकांनीपाठक यांचा आदर्श काही अंशी स्वीकारला तरी रस्त्यावरील ध्वनी प्रदूषण कमी होण्यास नक्कीच हातभार लागेल.**

# गोरक्षनाथ मोरे यांना मानद डॉक्टरेट प्रदान

## पं.दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठाकडून सन्मानित

**वांबोरी : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ पत्रकार,कृषी साहित्यिक, गोरक्षनाथ मं मोरे यांना मथुरा येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठाने मानद डॉक्टरेट ,डी लिट. पदवी देऊन सन्मानित केले आहे**



श्री. मोरे यांनी कृषी अभियांत्रिकी पदवी मिळाल्या नंतर पूर्णवेळ नोकरी न करता मुक्तपत्रकारीता,कृषीविषयक लेखन,पुस्तक प्रसिद्धी, शेतकरी चळवळीत सहभाग घेतला आहे.तीस वर्षे दैनिक सकाळ,लोकसत्ता, लोकमत आदी वृत्तपत्रांमध्ये पत्रकारिता केली.कृषी विद्यापीठ व शेतकरी संघटना आंदोलनात पाच वेळा तुरुंगवास भोगला. स्वयंसेवी संस्था, फार्मर्स क्लब,शेतकरी उत्पादक कंपनी यांच्यासाठी पूर्णवेळ सहयोग नोंदविला.

शरद जोशींच्या शेतकरी संघटना व भारतीय किसान सभेच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला आहे. सेवेच्या कालावधीत पाँडीचेरी,बडोदा, इंदोर,गोवा,ठाणे,पुणे आदी ठिकाणी कार्पोरेट कंपन्या च्या सेवेत शेती व शेतकऱ्यांसाठी कार्य केले. गेली काही वर्षे विविध भारतीय भाषांमध्ये ,विविध मासिके,साप्ताहिके,दैनिके यात त्यांचे लेखन प्रसिध्द होत आहे.

हिंदी भाषेत विविध विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. कृषी क्षेत्र व हिंदी भाषेसाठी केलेल्या या प्रयत्नांमुळे हिंदीच्या प्रसारासाठी स्थापन झालेल्या या विद्यापीठाने श्री.मोरे यांच्या कार्याची दखल घेऊन विद्यावाचस्पती, म्हणजेच मानद डॉक्टरेट डी लिट हा बहुमान श्री मोरे यांना दिला आहे. ,माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठाची स्थापना केली आहे.

यापूर्वी श्री. मोरे यांना नगरच्या पत्रमहर्षी दा.प.आपटे सर्वोत्तम पत्रकार पुरस्कार मिळाला आहे. मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर संस्थेचा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार जाहीर झाला आहे.अलंकारिक भाषेत मानपत्र लिहिण्याची संधी ,अनेक महनीय व्यक्तींसाठी त्यांना मिळाली आहे,डॉ अनिल काकोडकर, सुबोध कांत सहाय्य, शरद पवार, पृथ्वीराज चव्हाण, जे पी डांगे,राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव सौ सुजाता सौनिक,नरेंद्रचार्य महाराज यांच्यासाठीची मानपत्रे श्री मोरे यांनी लिहिली आहेत.

# ग्रामगीता सामाजिक संस्थेचे कार्य उल्लेखनीय

## खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन

**दरोडी : प्रतिनिधी**

**दरोडी येथील ग्रामगीता सामाजिक संस्थेचे कार्य उल्लेखनीय असून अध्यक्ष विष्णू दादा भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून तालुक्यातील मुंबई स्थायिक जनतेला पाठबळ देण्याचे काम एक सामाजिक कार्य म्हणून गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले.**



ग्रामगीता सामाजिक संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू दादा भोसले, उपाध्यक्ष खंडेराव चौगुले, सचिव ज्ञानेश्वर भोसले तसेच संस्थेचे पदाधिकारी व सदस्य तसेच पीर शेख बहाउद्दीन चिस्ती दर्गाहचे विश्वस्त अन्वर शेख तसेच दरोडी येथील विविध संस्थांचे पदाधिकारी व संचालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

खासदार लंके यांनी यावेळी या संस्थेचे व पदाधिकारी व सदस्य यांचे सामाजिक कार्याबद्दल कौतुक करीत संस्थेला तसेच गावकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सदैव कटीबद्ध असल्याची ग्वाही दिली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू दादा भोसले यांनी संस्थेची माहिती देताना सांगितले की पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन, वृक्षारोपण, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक कार्यात संस्थेने सातत्याने पुढाकार घेत दरोडी व परिसरातील गावांसाठी मोठ्या प्रमाणात योगदान देण्याचे काम केले आहे.

दरोडी व परिसरात केशर आंब्याची झाडे लावली असून आयुर्वेदिक वृक्ष लागवड करीत ज्येष्ठांना व सर्वसामान्य जनतेला पाठबळ देत मुंबई स्थायिक पारनेर तालुक्यातील जनतेची विकासाची कामे करण्यासाठी ग्रामगीता संस्था कटिबद्ध असून खासदार लंके हे विकासाचे महामेरू असल्याचे प्रतिपादन भोसले यांनी व्यक्त केले आहे .

# मोबाईलचा अतिवापर टाळणे गरजेचे

## डॉ. तुकाराम थोपटे यांचे प्रतिपादन

**पारनेर : प्रतिनिधी**

**मोबाईल आणि महिला हे विषय आपल्याला आधुनिक समाजातील एक महत्त्वपूर्ण संबंध दाखवत असल्याचे दिसून येते. असे प्रतिपादन उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांनी केले.**




पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अण्ड सायन्स महाविद्यालयाच्या वतीने चार दिवशीय मोबाईल साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते. उपप्राचार्य डॉ. थोपटे पुढे म्हणाले, मोबाईलचा योग्य वापर आपल्या जीवनात अनेक फायदे आणू शकतो. परंतु त्याचा वापर कसा करावा यासंबंधी समाजात जनजागृती होणे महत्त्वाचे आहे. महिलांसाठी मोबाईल साक्षरता कार्यशाळा त्यांच्या जीवनात सुधारणा घडवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साधन आहे यामुळे त्यांना तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून स्वतःच्या विकासासाठी वाव मिळतो तसेच समाजात त्यांच्या स्थानाची जाणीव होते या कार्यशाळांचा लाभ घेऊन महिलांनी त्यांच्या क्षमतांचा वापर करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाविद्यालयातील संगणकशास्त्र व बीबीएसीए विभागातील प्रा. सोनाली आंबेकर, प्रा. गौरी रणखांब यांनी सेनापती बापट माध्यमिक विद्यालय, पारनेर येथे डिजीटल व्यावहार या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रा. सोनाली आंबेकर मॅडम यांनी ऑनलाइन व्यवसाय आणि इतर आर्थिक संधीचा शोध या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रा. विद्या फंड, प्रा. आम्रपाली नगरे व प्रा. पूजा काळे यांनी मुलींचे वस्तीगृह पारनेर या ठिकाणी मोबाईलचा वापर करताना महिलांनी घ्यावयाची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रा. पूजा शिंगोटे व प्रा. प्रतिक्षा ढवळे यांनी मोबाईल साक्षरता या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रा. चैताली मते, प्रा. दीप्ती चत्तर व प्रा. विद्या ठुबे यांनी महिलांना आरोग्याशी संबंधित माहिती आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी मोबाईल या विषयावर मार्गदर्शन केले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक डॉ. सरिता कुंडलिकर आदी महिला प्राध्यापिका उपस्थित होत्या.

# नारायणगव्हाणच्या डॉ. ओंकारचा अटकेपार झेंडा !

## आंतरराष्ट्रीय बुध्दीबळ स्पर्धेत चौथा क्रमांक

**नारायणगव्हाण : प्रतिनिधी**

**अलेन येथे अबुधाबी स्पोर्टस कौन्सिलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतराष्ट्रीय बुध्दीबळ स्पर्धेत नारायणगव्हाणच्या डॉ. ओंकार शेळके याने अटकेपार झेंडा रोवत या स्पर्धेत चौथा क्रमांक पटकाविला.**



दुबईमध्ये पार पडलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतासह ऑस्टेलिया, अफगाणिस्तान, चीन, पाकिस्तान, श्रीलंका, फिलिपाईन्स, नेपाळ, ओमान, जॉर्डन, इराण, इराक, कुवेत, सिंगापूर, उझबेकीस्तान आदी ३१ देशांच्या बुध्दीबळपटूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत डॉ. ओंकार याने आपले कसब पणाला लावत स्पर्धे वर भारताची छाप सोडली व चौथा क्रमांक पटकाविला.

डॉ. ओंकार याचे वडील नानासाहेब शेळके हे झुआरी अ‍ॅग्रो कंपनीमध्ये वरीष्ठ अधिकारी पदावरून सेवानिवृत्त झाले आहे. नानासाहेब हे सेवेत असताना डॉ. ओंकार याची बुध्दीबळातील आवड लक्षात घेउन आई मंगल यांनी त्यास प्रोत्साहन देत विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी त्या स्वतः ओंकार सोबत विविध ठिकाणी जात. ओंकार याचे आजोबा कै. सोपानराव शेळके हे नारायणगव्हाण येथील प्रगतीशिल शेतकरी होते. आंतरराष्ट्रीय पातळीवर ओंकार याने घवघवीत यश संपादन केल्याबद्दल पारनेर तालुक्यासह नगर जिल्हयातून त्याचे कौतुक करण्यात येत आहे.

### आरोग्य विद्यापीठाचे तिनदा प्रतिनिधीत्व !

**डॉ. ओंकार मंगल नानासाहेब शेळके याने लोहगांव पुणे येथील डी वाय पाटील दंत महाविद्यालयात बीडीएसचे शिक्षण पुर्ण केले असून गेल्या पंधरा वर्षांपासून तो विविध बुध्दीबळ स्पर्धांमध्ये सहभागी होउन आपले वेगळेपण सिध्द करत आहे. नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे देशपातळीवर तिनदा प्रतिनिधित्व केले असून त्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक बक्षिसे मिळविली आहेत.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com